पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/६/कावि/१३६/२०१९
दिनांक : ११/४/२०१९

प्रति,

मा. ....................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०४/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल - २०१९ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक २०/०४/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

### कार्यपत्रिका क्रमांक – २९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल - २०१९ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक २०/०४/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक- २७ दिनांक २०/०२/२०१९ व दि.२२/०२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### प्रश्नोत्तरे

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

### नियुक्त्या

**विषय क्रमांक १)** मा.कुंदन अंबादास गायकवाड यांचे मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य पद रिक्त झाले असल्याने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ आणि कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**(दिनांक २०/४/२०१९ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)**

-------

<u>**मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे**</u>

**विषय क्रमांक २)** संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/७५/२०१९ दिनांक – ०४/०४/२०१९

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०३/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे –

**प्रपत्र“अ”**

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १६४८७ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १६४८७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १३९०६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण - १३३४३ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण - ८८६३ सी.एस.आर (एनजीओ) मार्फत बांधकाम - ४२७६ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला – २६२ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष – ३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ९८०७ लाभार्थी | GOI + GOM = ५८८.४२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = १९६.१४ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७८४.५६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ८९८२ लाभार्थी | GOI + GOM = ५३८.९२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = १७९.६४ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७१८.५६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

------

## <u>समित्यांचे अहवाल</u>

### <u>शिक्षण समिती</u>

**विषय क्रमांक ३)** अ) दिनांक ७/३/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २२/३/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/६/कावि/१३६/२०१९
दिनांक : ११/०४/२०१९

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस् ) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.